रजिस्टर नं. ८११० स्थापना : २० एप्रिल १९४०

टेलीफोन नं. मुख्य कार्यालय : २३२४१३८, २३२५०६७
टेलीफोन नं. चेअरमन : २३२५४८८
टेलीफोन नं. देवतळे (गॅसनोंदणी) : २३२२०१२, २३२३४५३, २३१०६१९
८८०६६६७३८७/८८/७७१५०१२३४५/७७१८०१२३४५
टेलीफोन नं. माणिकपूर : ९९७५५७७१५४

**अधिकृत भांडवल**
रु. ९,९०,०००-००
जमा झालेले भांडवल :
रु. ४,७२,१००-००

# व्यवस्थापक मंडळ

२०१५-२०२०

| | | |
|---|---|---|
| १ ) | **श्री. आशय हरेश्वर राऊत** | चेअरमन |
| २ ) | **श्री. समीर जनार्दन पाटील** | व्हा. चेअरमन |
| ३ ) | **श्री. हरेश्वर नारायण राऊत** | मानद् सचिव |
| ४ ) | **श्री. अनिल वामन पाटील** | सदस्य |
| ५ ) | **श्री. राजन देवजी राऊत** | सदस्य |
| ६ ) | **श्री. कृष्णकुमार अनंत पाटील** | सदस्य (५ डिसेंबर २०२० पर्यंत) |
| ७ ) | **श्री. हरिष कमळाकर पाटील** | सदस्य |
| ८ ) | **श्री. मनोज नरहर वर्तक** | सदस्य |
| ९ ) | **श्री. मोहन जगू पाटील** | सदस्य |
| १० ) | **श्री. मधुकर जीवन राऊत** | सदस्य |
| ११ ) | **श्री. भालचंद्र पद्मण राऊत** | सदस्य |
| १२ ) | **श्री. नरेश महादेव राऊत** | सदस्य |
| १३ ) | **श्री. नरेश जगन्नाथ राऊत** | सदस्य - इतर मागास वर्ग |
| १४ ) | **श्रीमती स्मिता दिनानाथ वर्तक** | सदस्या - महिला राखीव |
| १५ ) | **सौ. निता दिपक पाटील** | सदस्या - महिला राखीव |
| १६ ) | **श्री. विनित अरूण ऊमतल** | सदस्य - अनुसूचित जात / जमात |

## बँकर्स

१) ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., वसई शाखा २) बँक ऑफ इंडिया, बंगली शाखा
३) बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि., बंगली शाखा ४) वसई विकास सहकारी बँक लि., वसई

## ऑडीटर्स

- मा. मे. मनिष शिंदे अँड असोसियट, चार्टर्ड अकौंटंट, शासकीय प्रमाणित लेखा परिक्षक, सहकारी संस्था
- मे. बल्दानिया अँड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, (अंतर्गत हिशोब तपासणीस)

# सभासदांना महत्त्वाच्या सूचना

१) वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्यासाठी सभासदांना लॉगिन आयडी / यूजर आयडी व पासवर्ड वापरावा लागेल जे दि. २४-३-२०२१ रोजी नोंदणीकृत मोबाईल नंबरवर एसएमएसद्वारे पाठविला जाईल.

२) सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेला डेस्कटॉप / लॅपटॉप / स्मार्ट फोन या उपकरणाचा वापर करून इंटरनेटद्वारे सभेला उपस्थित / हजर राहू शकतो.

३) दि. २७-३-२०२१ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सभासदांना नियोजित वेळेच्या ३० मिनिटे अगोदर (सकाळी ९.०० वाजता) लॉगिन करण्याची विनंती आहे.

४) सर्व सभासदांना विनंती आहे की, सभेपुढील विषय पूर्ण झाल्यानंतर त्यांनी त्यांचे प्रश्न सकाळी ११.३० ते १२.०० वाजेपर्यंत https://bamcos.eagm.cloud या लिंकद्वारे पाठवायचे आहेत. प्रश्नांची उत्तरे त्याच लिंकवर दुपारी ३.३० वाजेपर्यंत देण्यांत येतील.

५) सभासदांनी दि. २७-३-२०२१ रोजी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सादर केलेल्या ठरावांवर https://bamcos.eagm.cloud या लिंकद्वारे ठराव पास होण्यासाठी होय / नाही (Yes / No) या ऑप्शनवर क्लिक करावे. त्याचा निकाल लिंकवर दुपारी ३.३० वाजेपर्यंत मिळेल.

६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे यांचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.२४/१३-स दिनांक २५-२-२०२१ नुसार वार्षिक सर्वसाधारण सभा (VC/OVAM) द्वारे आयोजित करण्यासाठी तज्ज्ञ एजन्सी M/s. TANNUM Consulting LLP यांची यांची नेमणूक केलेली असून ऑनलाईन ठराव पास करण्याची सुविधा उपलब्ध करून देणार आहोत.

७) सभासदांना विनंती आहे की, लॉगिंन करण्याविषयी काही अडचण असेल तर दि. २७-३-२०२१ रोजी मोबाईल नं. ९६१९२८०४५५ यावर सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत संपर्क करावा.

८) सभासदांना विनंती आहे की, आपले मोबाईल नंबर संस्थेच्या कार्यालयात लवकरांत लवकर कळवावे.

# ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४/१३-स दिनांक २४-२-२०२१ नुसार वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड, देवतळे या संस्थेची ८१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. २७ मार्च २०२० रोजी सकाळी ९.३० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्स/ऑडीओ व्हिज्युअल माध्यमद्वारे (VC/OAVM) खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे. प्रत्यक्षात उपस्थिती अपेक्षित नाही. संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय देवतलाव येथील सभागृह हे संस्थेचे स्थान मानण्यात येईल. आपण ऑनलाईन सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दु:खवट्याचे ठराव करणे.
२) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
३) सन २०१९-२०२० सालचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक मंजूर करणे.
४) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१९-२०२० सालच्या नफा-वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०१५-१६ सालची सभासदांनी न नेलेली डिव्हीडंड रक्कम रु. ३,१३५.०० रिझर्व्ह फंड खाती वर्ग करण्यांत आली आहे त्यांस मंजुरी देणे.
६) सन २०२०-२०२१ सालासाठी बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.
७) सन २०२०-२०२१ सालासाठी सभासदांचे नॉर्मल क्रेडीट ठरविणे.
८) सन २०२०-२०२१ सालासाठी शासकीय लेखा परिक्षक नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
९) सन २०२१-२०२२ वर्षासाठी अंतर्गत हिशोब तपासणीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
१०) सन २०१९-२०२० या वर्षाच्या शासकीय लेखा परिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
११) सन २०२०-२०२१ या वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
१२) ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

देवतळे - वसई
दिनांक : २८-१२-२०२०

आपला विश्वासू,
**हरेश्वर नारायण राऊत**
मानद् सचिव

**टीप :** १) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या पोटनियम क्र. २१(१) प्रमाणे वरील ठिकाणी एक तासानंतर त्याच विषयावर घेण्यात येईल. तहकुबीनंतरच्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. (२) आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वार्षिक अहवालाची संपूर्ण प्रत हवी असल्यास संस्थेच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. (३) आवश्यकतेनुसार काही रक्कमांचे एकत्रीकरण / वर्गीकरण केले आहे. (४) अहवालात नमूद केलेल्या जमाखर्च व ताळेबंद वगैरे विषयाची माहिती ज्या सभासदांस पाहिजे असेल त्यांना दिनांक २० मार्च २०२१ पर्यंत कार्यालयात मिळू शकेल. काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सदरहू प्रश्न दिनांक २४ मार्च २०२१ पर्यंत कार्यालयीन वेळात लेखी पाठवावेत. वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य त्या तपशीला अभावी देता येणे शक्य होईलच असे नाही. (५) शासकीय लेखा परीक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल संस्थेच्या दप्तरी पहावयास उपलब्ध आहे.

# ☆ अहवाल वर्ष ८१ वे ☆

## १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०

सन्माननीय सहकारी सभासद बंधु भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४/१३-स दिनांक २४-२-२०२१ नुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सभेस उपस्थितांचे व्यवस्थापक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत करतो. संस्थेचा १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेरचा ८१ वा वार्षिक अहवाल, त्या सोबत त्याच कालावधीचा अंतर्गत हिशोब तपासनीसांनी प्रमाणित केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, व्यापारी पत्रक व्यवस्थापक मंडळाच्या वतीने आपणांस सादर करतो. आपण त्यास मंजूरी द्यावी ही विनंती.

### भाग भांडवल :

अहवाल वर्षी संस्थेचे एकूण भांडवल रु. ४,७२,१००/- इतके झाले आहे. अहवाल साली सभासद संख्या १००२ आहे.

### ठेवी :

वर्ष अखेरीस संस्थेकडे रु. २१,०५,४४४/- मुदत ठेवी आहेत. संस्थेच्या सभासदांनी, हितचिंतकांनी संस्थेवरील विश्वास, आस्था व सहकार्याच्या भावनेने आपल्या ठेवी संस्थेकडे गुंतविल्याबद्दल ठेवीदारांचे मन:पूर्वक आभार मानतो. अहवालवर्षी संस्थेकडे रु. ४५,७७३/- च्या बचत ठेवी जमा आहेत.

### रिझर्व्ह फंड व इतर फंड :

अहवाल वर्षारंभी वरील फंडाची रक्कम रु. ७,८०,३२,६२४/- होती. त्यात वाढ होऊन वर्ष अखेरीस रु. ८,४८,०८,४७७/- एवढी झाली. या फंडाची झालेली वाढ संस्थेच्या स्थैर्यात व विश्वासात भर घालणारी आहे.

### गुंतवणूक :

अहवाल वर्षारंभी रु. ७,२१,६४,५७२/- ची गुंतवणूक होती. त्यात अहवाल वर्षी वाढ होऊन वर्षअखेर रु. ८,०४,५१,९९०/- एवढी गुंतवणूक झाली आहे.

### व्यवस्थापक मंडळ :

अहवाल सालात व्यवस्थापक मंडळाच्या १३ सभा झाल्या. त्यात मासिक सभा, तातडीची सभा व विशेष सभेचा अंतर्भाव आहे. उपसमितीच्या ७ सभा झाल्या. या सर्व सभांना कार्यकारी मंडळाचे सदस्य नियमितपणे उपस्थित राहिले. संस्थेच्या प्रगतीत त्यांनी उपयुक्त सहभाग व सहकार्य केले. गणसंख्येच्या अभावी एकही सभा तहकूब करावी लागली नाही.

### सभासद कर्जे :

अहवाल वर्षारंभी सभासदांकडून रु. १,७९,८८५.०० कर्जे येणी होती. वर्ष अखेरीस एकूण रु. १,८०,९८५.०० कर्ज रक्कम सभासदांकडून येणे बाकी राहिली आहे. कार्यकारी मंडळाने शेती पूरक कर्ज वाटप चालू केले आहे.

त्याचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा.

## ऑडीट ( लेखा परिक्षण ) :

संस्थेचे सन २०१९-२०२० सालचे शासकीय लेखा परिक्षण मा. मनिष शिंदे अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटन्टस् यांनी केले असून लेखा परिक्षण अहवाल मिळालेला आहे. संस्थेस या वर्षी ''**अ**'' वर्ग देण्यांत आला आहे. त्याचा अहवाल सोबत जोडला आहे.

सन २०१९-२०२० सालचे अंतर्गत लेखा परिक्षण संस्थेने नेमलेले मे. बल्दानिया अँड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, वसई ह्यांनी पूर्ण केले असून त्यांचा अहवाल सोबत जोडला आहे.

## विक्री केंद्र :

संस्था देवतलाव, होळी बाजार, किरवली, कौलार बुद्रुक (रानगांव), मुळगांव व उंबरगोठण येथे शेती वस्तुंचे सहा डेपो व होळीबाजार, किरवली, उमेळे व वासळई येथे किराणा मालाची चार दुकाने चालवित आहे. देवतलाव येथे शेती बागायती व जीवनोपयोगी वस्तुंशिवाय लोखंड, पाईप, लोखंडी पत्रे, सिमेंट, सिमेंट पत्रे, व्हाईट सिमेंट, सिमेंट ब्लॉक्स, नेरोलॅक पेंट, निलकमल प्लास्टीक खुर्च्या / टेबले व इतर उत्पादने तसेच पतंजलीची उत्पादने, पी.व्ही.सी. पाईप, पाईप फिटींगचे सामान, ठिबक सिंचन पद्धत व तुषार संचाचे सामान, भारत गॅस विक्री, गॅस करिता लागणाऱ्या सुरक्षा ट्युब व उपकरणे, मिश्रणखत विक्री केंद्र, भारत पेट्रोलियम कंपनीचे वंगणतेल व सिन्टेक्स पाण्याच्या टाक्यांची विक्री चालवित आहोत. संस्थेची देवतलाव, माणिकपूर येथे भारत गॅस विक्री केंद्रे आहेत. तसेच देवतलाव, सोपारा, मरियम नगर व माणिकपूर येथील गाळे भाडेतत्वावर चालविण्यास दिले आहेत.

संस्थेने सामान्य माल, किराणा माल, भारत गॅस माल व मिश्रण खत माल या विभागांत अहवाल वर्षी रु. ४६,८७,३७,४०६/- ची खरेदी केली आहे. तसेच रु. ५१,८७,४१,१७२/- ची विक्री केलेली आहे. अहवाल वर्षी संस्थेस व्यापारी नफा रु. २,०९,९७,४८७/- झालेला आहे व निव्वळ नफा रु. ९०,४८,१३२/- झालेला आहे.

अहवाल वर्षी संस्थेने सभासद व ग्राहक यांना दि. १० ऑक्टोबर २०१९ ते दि. ३१ डिसेंबर २०१९ या सणासुदीच्या कालावधीमध्ये व्यवस्थापनाने किराणामाल माल खरेदीवर ग्राहकांना ३% प्रमाणे सूट देण्याचे प्रस्तावित केले होते. सभासदांनी व ग्राहकांनी या संधीचा फायदा घेतला. अहवाल वर्षी संस्थेने सभासदांना गतवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील दि. १० ऑक्टोबर २०१९ ते दि. १० नोव्हेंबर २०१९ या कालावधीसाठी सभासदांना ८ किलो साखर प्रति किलो रु. ३२/- या सवलतीच्या दराने दिली होती.

## सेवक वर्ग :

संस्थेस लाभलेल्या कार्यक्षम सेवकवर्गाने दिलेल्या उत्तम सहकार्यामुळे संस्थेला आजची प्रगती करणे साध्य झाले आहे व यापुढेही त्यांचे असेच सहकार्य लाभत राहील अशी आशा बाळगतो. संस्थेचे एकूण १०८ कर्मचारी आहेत. त्याचा खातेप्रमाणे तपशील येणे प्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कार्यालयीन कर्मचारी | : | ०९ |
| जनरल शॉप कर्मचारी | : | २८ |
| भारत गॅस कर्मचारी | : | १६ |

| | | |
|---|---|---|
| चालक | : | ०७ |
| लॉरीवरील हमाल | : | १९ |
| हातगाडीवरील हमाल | : | २९ |
| **एकूण** | : | **१०८** |

सर्व कर्मचारीवृंदासाठी अहवाल वर्षी पगार, सानुग्रह अनुदान म्हणून रुपये १,९०,८६,४८८.०० खर्च करण्यांत आले आहेत. ट्रायसिकल व हातगाडी कामगार यांना इन्सेन्टीव्ह म्हणून रक्कम रु. १६,३९,१४१/- दिलेली आहे. या सर्व खर्चास आपण मंजूरी द्यावी ही विनंती. अहवाल वर्ष अखेर कर्मचारीवृंदाकडून रु. ३,८१,७४६.०० कर्ज येणे बाकी आहे.

## शेतकी व्याख्यान :

आपल्या संस्थेने शनिवार दि. २८ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता आपल्या संस्थेच्या सभागृहात शेतकी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर व्याख्यानात मा. श्री. उत्तम सहाणे, शास्त्रज्ञ, पीक संरक्षण, कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड, डहाणू यांनी '**नारळ पिकावरील काळी बुरशी विषयी मार्गदर्शन**' या विषयावर मार्गदर्शन केले. व श्री मा. सुभाष भट्टे, कृषी भूषण राज्य पुरस्कार प्राप्त यांनी '**फुलशेती लागवड, मशागत व मार्केटिंग**' या विषयी मार्गदर्शन केले.

## सहकार प्रशिक्षण :

९७ व्या घटना दुरुस्ती अन्वये व सहकार कायदा कलम २४ नुसार (अ, क) संस्थेच्या सभासदांना सहकारी प्रशिक्षण व धर्मदाय फंडाचे वाटपाचा कार्यक्रम बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२० रोजी संध्याकाळी ४.०० वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित केला होता. सदर सहकार प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक म्हणून मा. श्री. टी. के. पानस्कर, जिल्हा सहकार बोर्ड लि., कल्याण व मा. श्री. योगेश देसाई, उपनिबंधक, सहकारी संस्था वसई यांनी सभासदांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

## कोरोना काळातील मदत :

संस्थेने कोरोना काळामध्ये सामाजिक बांधिलकी जपून अनेक प्रकारे मदत केली. मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रुपये ५ लाखाचा धनादेश मा. तहसिलदार साहेबांकडे सुपूर्द केला. कोरोनाबाबत अनेक ठिकाणी सामाजिक कार्य करणाऱ्या संघटनाकडून खिचडी व अन्न पुरविण्याचे उपक्रम राबविले गेले, त्यास संस्थेने तांदुळ, तेल व कडधान्य तसेच कमर्शिअल सिलेंडर विनामूल्य देवून सामाजिक कार्यास हातभार लावला. सामाजिक संघटनेकडून एका गरीब शेतकऱ्याच्या जनावरांची अन्नाची उपासमार होत असल्याने मदतीसाठी जनावर खाद्य विनामूल्य पुरविण्यात आले. कोरोना काळात संस्थेने कर्मचाऱ्यांसाठी विनामुल्य मास्क व सॅनिटायझर पुरविण्यात आले. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी विशेष भत्ता म्हणून रु. २५००/- देण्यात आले. तसेच संस्थेने अनेक वेगवेगळया माध्यमातून कोरोना रोखण्यासाठी सामाजिक भान ठेवून काम केले.

## आरोग्य शिबीर :

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे जागतिक स्तरावर जनजीवन विस्कळीत झाले होते. अशा परिस्थितीत संस्थेच्या

कर्मचारी वर्गाने अत्यावश्यक सेवाअंतर्गत सर्व सेवा ग्राहकांस उपलब्ध करून दिल्या. अशावेळी कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे होते, त्यादृष्टीने कर्मचाऱ्यांसाठी दि. २२ व २४ एप्रिल २०२० रोजी वैद्यकिय तपासणी करण्यात आली. सदर वैद्यकीय तपासणीसाठी डॉ. सुनिल डी. रनाईत व त्यांचे सहकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## भारत गॅस :

भारत गॅस विभागातील स्पर्धा दिवसेंदिवस वाढलेली आहे. सरकार व कंपनीच्या धोरणामुळे या व्यवसायातील मोठे बदल झालेले आहेत. ग्राहकांच्या सेवेसाठी अनेक धोरणे राबविली जात आ हेत. ज्या वितरकांची ग्राहक सेवा चांगली त्यास **स्टार रेटींग** देण्यात येत आहे. संस्थेने आपले **फाईव्ह स्टार रेटींग** कायम ठेवलेले आहे. कोरोनाच्या काळात संस्थेने ग्राहकांना तत्पर सेवा व अखंडपणे सिलेंडरचा पुरवठा केला. या काळात एकही दिवस काम बंद न ठेवता जास्तीत जास्त सिलेंडर वितरणाचे काम संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी जोखीम घेऊन केले.

## सभासद कल्याण निधी :

अहवाल वर्षी संस्थेने १४ सभासदांना रु. १,००,२६०/- त्यांच्या विनंतीवरून गंभीर आजारात सभासद कल्याण निधीतून आर्थिक मदत केली आहे.

## कर्मचारी कल्याण निधी :

अहवाल वर्षी संस्थेने ९ कर्मचाऱ्यांना रु. ४७,९५०/- त्यांच्या विनंती वरून गंभीर आजारात कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत केली आहे.

## सभासदांनी खालील सूचनांची नोंद घ्यावी :

१) **नवीन भाग दाखले तयार असून सभासदांनी आपले भाग दाखले संस्थेच्या मुख्य कार्यालयातून दुपारी ३ ते ५ ह्या वेळेत घेऊन जावेत.**

२) सभासदांनी आपल्या डिव्हिडंडची रक्कम स्वीकारावी. तीन वर्षावरील न घेतलेल्या डिव्हिडंडची रक्कम सहकारी कायद्याप्रमाणे रिझर्व्ह फंडात वर्ग करावी लागते.

३) सभासदांच्या जुन्या पत्त्यामध्ये बदल झालेला असल्यास नवीन पत्ता कळवावा. तसेच आपला मोबाईल नंबर संस्थेस कळवावा.

४) ज्या सभासदांनी ओळखपत्र देण्यासंबंधी अजूनही फोटो दिलेले नसतील अशा सभासदाने पोष्ट टिकिटसाईज आपले दोन फोटो कार्यालयात देऊन आपले ओळखपत्र लवकरांत लवकर घेऊन जावे.

५) सभासदांनी वारस नोंद केली नसल्यास वारस नोंद करावी.

# नफा वाटणी

संस्थेस अहवाल वर्षी निव्वळ नफा रु. ९०,४८,१३२.५५ एवढा झालेला आहे. त्याची विभागणी पोटनियमानुसार करण्यांत आलेली आहे. बाकी उरलेल्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे व्यवस्थापक मंडळाने सुचविली असून आपण त्यास मान्यता द्यावी ही विनंती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड | २५% | रु. | २२,६२,०३३.०० |
| २. | स्पेशल इम. रिझर्व्ह फंड | १०% | रु. | ९,०४,८१३.०० |
| ३. | इमारत फंड | ५% | रु. | ४,५२,४०७.०० |
| ४. | बुडीत फंड | ५% | रु. | ४,५२,४०७.०० |
| ५. | सभासद डिव्हीडंड | १५% | रु. | ७०,८१५.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ६% | रु. | ५,४२,८८८.०० |
| ७. | कामगारवृंद कल्याण निधी | ३% | रु. | २,७१,४४४.०० |
| ८. | मानधन | | रु. | १४,४००.०० |
| ९. | धर्मदाय फंड | | रु. | २,००,०००.०० |
| १०. | कृषि विकास फंड | | रु. | ३,००,०००.०० |
| ११. | इमारत फंड | | रु. | ३२,००,०००.०० |
| १२. | आकस्मित फंड | | रु. | ३,७६,९२५.५५ |
| | | | **एकूण रुपये** | **९०,४८,१३२.५५** |

## क्रियाशील सभासद :

क्रियाशील सभासद म्हणजे संस्थेचा असा सभासद जो संस्थेच्या सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व सभासदांच्या अधिमंडळाच्या किमान एका सभेला उपस्थित आहे आणि खालील बाबींपैकी एका बाबीची पूर्तता केली आहे असा भागधारक सभासद.

१) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किमान एक वेळा अल्प मुदत कर्ज (रोख रकमेच्या स्वरूपात अथवा अन्य प्रकारे) अथवा मध्यम मुदत कर्ज घेतले अथवा दिर्घ मुदत कर्ज घेतले असले पाहिजे.

२) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये कमीत कमी रु. १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) ठेव सलग कमीत कमी एक वर्षाच्या कालावधीकरीता ठेवली असली पाहिजे.

३) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये संस्था पुरवित असलेल्या उपरोक्त सेवाखेरीज इतर सेवांचा किमान एकदा उपभोग घेतला असला पाहिजे.

## आम्ही आपले आभारी आहोत

- मा. खासदार श्री. राजेंद्र गावित, लोकसभा सदस्य, भारत सरकार.
- मा. आमदार श्री. हितेंद्र ठाकूर व श्री. क्षितिज ठाकूर, विधान सभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
- जिल्हा उपनिबंधक श्री. दिगंबर हौसारे साहेब व त्यांचे सहकारी.
- वसई तालुक्याचे उपनिबंधक श्री. योगेश देसाई व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई तालुक्याचे तहसिलदार सौ. उज्वला भगत
- वसई तालुक्याचे प्रांत अधिकारी श्री. दिपक क्षीरसागर साहेब.
- ठाणे जिल्हा मध्य. सहकारी बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग व वसई शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी वर्ग.
- बँक ऑफ इंडिया, बंगली शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी वर्ग.
- बसीन कॅथॉ. बँकेचे चेअरमन व जनरल मॅनेजर, कर्मचारीवृंद व बंगली शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई विकास बँकेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वर्ग.
- ठाणे जिल्ह्याचे कृषि अधिकारी व त्यांचे सहकारी.
- कृषि उत्पन्न बाजार समिती वसई यांचे चेअरमन व संचालक मंडळ.
- वसई तालुक्याचे गटविकास अधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई पंचायत समितीचे कृषी अधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई तालुका पुरवठा अधिकारी व त्यांचे सहकारी.
- शासकीय प्रमाणित लेखा परिक्षक श्री. मनिष शिंदे व त्यांचे सहकारी.
- भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे विभागीय व्यवस्थापक, उरण विभागाचे टेरिटरी मॅनेजर श्री. राजविंदर सिंग साहेब, उरण एल पी जी विभागाचे समन्वयक श्री. फिरोज अक्तर साहेब व आपल्या विभागाचे बीपीसीएल कंपनीचे अधिकारी श्री. वैभव श्रीवास्तव व त्यांचे सहकारी.
- महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळाचे अधिकारी व विक्री व्यवस्थापक.
- राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लिमिटेडचे अधिकारी व विक्री व्यवस्थापक.
- ए.सी.सी. कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- हैद्राबाद कंपनीचे मार्केटिंग अधिकारी व त्यांचे सहकारी.
- जैन पाईप कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- नेरोलॅक कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे युनिट, बिर्ला व्हाईट सिमेंट कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- सिन्टेक्स कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- मल्टीप्लेक्स कंपनीचे श्री. शेट्टी साहेब व त्यांचे सहकारी.
- संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व सेवाभावी संस्था व त्यांचे पदाधिकारी.
- संस्थेचे सन्माननीय सभासद, ग्राहक, ठेवीदार व हितचिंतक यांनी आस्थेने संस्थेवर नितांत प्रेम व विश्वास दाखवून संस्थेला उत्कर्षाच्या भक्कम पायावर उभे केल्याबद्दल.
- संस्थेचा कर्मचारीवृंद.

आपणा सर्वांकडून लाभत असलेले सहकार्य उत्तरोत्तर वाढत जावो हीच सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करीत आहे.

**!! जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

देवतळे, वसई. — **आशय हरेश्वर राऊत**

दि. : २८ डिसेंबर २०२० — चेअरमन

## दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० पर्यंत

| २०१८-२०१९ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १,६४,२३,७५९.०० | **आरंभी शिल्लक माल** | | १,८५,३७,१०१.०० |
| | **माल खरेदी** | | |
| १२,५८,८८,४८३.०० | सामान्य माल | ८,८२,५०,३५६.०० | |
| ३,०३,००,६४४.५० | किराणा माल | ३,६१,५२,५११.०० | |
| ३९,०१,५३,६८४.०० | भारत गॅस माल | ३३,२९,३७,४५७.०० | |
| १,१९,६३,५७२.०० | मिश्रण खत माल | १,१३,९७,०८२.०० | |
| | | | ४६,८७,३७,४०६.०० |
| | **खर्च** | | |
| १६,०६,०३३.०१ | सामान्य माल | १५,२५,२३२.५३ | |
| ८,५२,४२३.७४ | किराणा माल | ७,००,४०५.०० | |
| ८८,३८,९८६.९१ | भारत गॅस माल | १,०२,९३,९९५.१६ | |
| २,३८,८६९.०० | मिश्रण खत माल | १,५१,६३५.७६ | |
| २,५००.०० | व्यवसाय कर | २,५००.०० | |
| | | | १,२६,७३,७६८.४५ |
| ५४,८५,४८४.४६ | **वाहतूक खाते** | | ४२,०८,६४३.९० |
| | **वेतन** | | |
| १८,५१,६३०.०० | सामान्य माल | २९,७५,२२७.०० | |
| २२,६४,४८०.०० | किराणा माल | २२,४६,४९०.०० | |
| ६४,५६,०६९.०० | भारत गॅस माल | ७३,१४,०९९.०० | |
| ९,१०,९१४.०० | मिश्रण खत माल | ८,०३,०१९.०० | |
| १२,३८,१८८.०० | वाहतूक खाते | १४,८६,५२७.०० | |
| | | | १,४८,२५,३६२.०० |
| १०,०३,७४२.७८ | **रिफंड / डेबीट नोट** | | ७,१८,४७६.२५ |
| १,८४,१८,२७५.७३ | **व्यापारी नफा** | | २,०९,९७,४८७.६६ |
| **६२,३८,९७,७३९.१३** | **एकूण** | | **५४,०६,९८,२४५.२६** |

## व्यापारी पत्रक

| २०१८-२०१९ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **माल विक्री** | | |
| १३,०१,९०,७२४.८१ | सामान्य माल | ९,५९,६९,१३८.६० | |
| ३,५९,३१,२२६.५९ | किराणा माल | ३,९८,९६,८७७.५२ | |
| ४१,९२,७८,३१८.८२ | भारत गॅस माल | ३७,०८,६८,३६१.५० | |
| १,२५,५४,७७१.५७ | मिश्रण खत माल | १,२०,०६,७९४.७० | |
| | | | ५१,८७,४१,१७२.३२ |
| | **बारदान विक्री** | | |
| ७,०३५.०० | किराणा माल | ---- | |
| १५,४९४.०० | मिश्रण खत माल | ---- | |
| | | | ---- |
| | **रिकामी डबे विक्री** | | |
| २,१९२.०० | किराणा माल | ---- | ---- |
| १३,४६,४८१.९६ | **वाहतूक खाते** | | २२,१५,००६.४६ |
| ६०,३४,३९३.३८ | **रिफंड / क्रेडीट नोट** | | ३३,०२,६५६.४८ |
| १,८५,३७,१०१.०० | **अखेर शिल्लक माल** (३१-३-२०२०) | | १,६४,३९,४१०.०० |
| ६२,३८,९७,७३९.१३ | **एकूण** | | ५४,०६,९८,२४५.२६ |

## दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० पर्यंत

| २०१८-२०१९ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **व्याज खाते** | | |
| १,८९,४९४.०० | ठेवींवरील | १,६२,४८५.०० | |
| १,४९४.०० | बचत खात्यावरील | १,५४८.०० | |
| १,०८,४९४.०० | व्याज (बँक अकौंटवरील) | १,७८५.०० | |
| | | | १,६५,८१८.०० |
| | **खर्च** | | |
| ८,६७,५२७.५७ | कार्यालयीन | १०,६१,७८६.७७ | |
| २६,०२,७५५.०० | वेतन – कार्यालयीन | २३,१८,२९२.०० | |
| ५,१९,२५०.०० | कामगार प्रॉ. फंड – सोसायटी वर्गणी | ६,५०,१३८.०० | |
| ११,४६,३९९.०० | फॅमिली पेन्शन – सोसायटी वर्गणी | ११,७३,३७१.०० | |
| ९,२२,७०४.०० | इ. एस्. आय. सी. – सोसायटी वर्गणी | ६,७४,२७४.०० | |
| ७६,१०९.०० | प्रॉ. फंड ॲडमिनीस्ट्रेटीव्ह फी | ७४,६५८.०० | |
| ७०,६३२.०० | लिंक इन्शुरन्स ॲडमिनीस्ट्रेटीव्ह फी | ६९,७३०.०० | |
| ७,६६,२३५.०० | कामगारवृंद घरभाडे | ८,५७,२१२.०० | |
| २,२७,९२६.०० | कामगारवृंद बोनस | १८,९७,८३४.०० | |
| | | | ८७,७७,२९५.७७ |
| | **कर व शुल्क** | | |
| ६,६८,३२९.०० | आयकर | ३०,७०,०६६.२० | |
| ७८,०३१.०० | घरपट्टी | १,१४,१२०.०० | |
| २,२७,२५२.०० | वॅट टॅक्स | ३,५३,८६१.०० | |
| १२,६१०.०० | जमिनधारा खर्च | १२,६१०.०० | |
| ३,७८,८००.०० | ऑडीट फी | ४,१३,७५२.०० | |
| | | | ३९,६४,४०९.२० |

(पान नं. १४ वर)

## नफा तोटा पत्रक

| २०१८-२०१९ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **व्याज खाते** | | |
| ५३,००,३०३.१२ | गुंतवणूकीवरील | ५९,६२,०६५.९५ | |
| ९१,८६३.७२ | कर्ज रकमेवरील | ७५,०९२.०० | |
| १,४१०.०० | बँक अकौंट वरील | १,४३९.०० | |
| | | | ६०,३८,५९६.९५ |
| | **भाडे जमा** | | |
| ९,०३,५५०.०० | सभागृह | १२,३३,५००.०० | |
| ३,९०,५००.०० | गाळा भाडे | ५,७३,५००.०० | |
| | | | १८,०७,०००.०० |
| | **इतर जमा** | | |
| २,९३,९००.०० | प्रशासकीय फी | ३,५०,३५०.०० | |
| ८८०.०० | शेअर ट्रान्सफर फी | ६५०.०० | |
| २७०.०० | वारस बदल फी | १२०.०० | |
| ८०.०० | नामधारी सभासद फी | ८०.०० | |
| १,१०,२००.०० | मॅन्डेटरी इन्स्पेक्शन फी | ४८,२००.०० | |
| ३,३८,५००.०० | सर्व्हिस चार्ज व इन्स्टॉलेशन फी | ३,६६,९७५.०० | |
| ८००.०० | लागवड | ---- | |
| | | | ७,६६,३७५.०० |
| | (पान नं. १५ वर) | | |

## दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० पर्यंत

| २०१८-२०१९ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १२ वरुन) | | |
| | **इतर खर्च** | | |
| १४,३१,१२३.४५ | झिज | १०,३९,५२४.८२ | |
| ४,९६,६९१.०० | विमा हप्ता | ६,५३,६०८.०० | |
| १,१७,४५०.९१ | टेलिफोन बिल | १,०१,८४२.०० | |
| २,१७,०२३.०० | बिल्डींग दुरुस्ती | ३,१३,८५७.०० | |
| ५,६८,८८०.०० | विद्युत बिल | ४,९८,०००.०० | |
| १,०३,१३९.०० | सभागृह खर्च | २,२९,६१६.०० | |
| ९०,६४६.८१ | बँक चार्जेस | १८,८९७.९९ | |
| २,३२,४१८.३० | वार्षिक सभा खर्च | २,६५,५४८.०० | |
| १,०५,८४६.५० | सुट | ५७,२०७.०६ | |
| ८१,५१५.०० | का. मं. मा. मिटींग खर्च | ६३,६८९.०० | |
| १८,१५४.०० | कॅश व्हॅन एमएच-०४-सीटी ३८०३ | ३,९८७.०० | |
| १,२२,४४६.०० | प्रवास खर्च | १,२९,८५१.०० | |
| १,५०,२८४.८० | जनरेटर खर्च | १,६९,९१०.६० | |
| १,८६,६२४.०० | संगणक खर्च | ८०,०९४.५० | |
| ४५,०००.०० | भत्ता | ४५,०००.०० | |
| ८,१७२.०० | कामगार वेलफेअर फंड | ७,५६०.०० | |
| ४३,४५,७४८.०० | खर्च तरतूद | ३६,००,०००.०० | |
| | | | ७२,७८,१९२.९७ |
| ३,२३,२३७.५० | **प्रिंटींग स्टेशनरी** | | ३,७७,९४७.०० |
| ८३,४२,०९०.७३ | **निव्वळ नफा** | | ९०,४८,१३२.५५ |
| २,५८,५०,५३२.५७ | **एकूण** | | २,९६,११,७९५.४९ |

## नफा तोटा पत्रक

| २०१८-२०१९ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १३ वरुन) | | |
| | इतर जमा (अनामत येणे रक्कम) | | २,३३५.८८ |
| १,८४,१८,२७५.७३ | **व्यापारी नफा** | | २,०९,९७,४८७.६६ |
| २,५८,५०,५३२.५७ | **एकूण** | | २,९६,११,७९५.४९ |

**दि. ३१ मार्च २०२०**

| २०१८-२०१९ रुपये पैसे | भांडवल व देणे | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ९,९०,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ९,९०,०००.०० |
| | **वसूल भाग भांडवल** | | |
| ४,७२,१००.०० | सभासद | | ४,७२,१००.०० |
| | **फंड** | | |
| १,९३,१२,५५३.१२ | रिझर्व्हे फंड | २,१४,०२,४२८.१२ | |
| ७५,९६,६०३.४३ | स्पेशल इम. रिझर्व्हे फंड | ८४,४८,३७१.४३ | |
| ३,२५,५०२.०८ | डिव्ही. इक्वी. फंड | ३,२५,५०२.०८ | |
| १,११,७०,२२१.९० | बिल्डिंग फंड | १,१५,८७,३२६.९० | |
| ३,३४,८६,०००.०० | बिल्डिंग फंड -भारत गॅस गोडावून | ३,६४,८६,०००.०० | |
| ५६,२५,०८३.८७ | बुडीत फंड | ६०,४२,१८८.८७ | |
| ५,१६,६६०.०० | बिल्डिंग रिझर्व्हे फंड | ५,१६,६६०.०० | ८,४८,०८,४७७.४० |
| | **इतर फंड** | | |
| १७,९३,०२९.४२ | धर्मदाय फंड | १७,८७,०२९.४२ | |
| ३६,३३,९२९.३५ | नोकर ग्रॅच्युईटी फंड | ५०,१६,३६४.३५ | |
| ३६,२४,८८१.४६ | कृषी विकास फंड | ३९,२४,८८१.४६ | |
| ७४,५१,०१९.११ | आकस्मित तरतूद | ७९,६०,५५४.८४ | |
| १७,१३,८५१.०० | कामगार कल्याण निधी | १९,१६,१६४.०० | |
| ३१,५८,३४२.०० | सभासद कल्याण निधी | ३५,५८,६०७.०० | |
| २५,०००.०० | निवडणूक निधी | २५,०००.०० | २,४१,८८,६०१.०७ |
| | **ठेवी** | | |
| २१,८२,१४०.०० | मुदत ठेव | २१,०५,४४४.०० | |
| ४४,२२५.०० | सेव्हिंग ठेव | ४५,७७३.०० | २१,५१,२१७.०० |
| | **देणी** | | |
| ९,७२०.०० | डिव्हिडंड सभासद | ११,१००.०० | |
| १०,४४,४४०.१८ | अनामत | ८,०४,३११.९० | |
| १६,१४,८८१.५० | व्यापारी देणे | ३६,५५,५०२.१५ | |
| १८,३५,५३४.०६ | ॲडव्हान्स | २५,४२,८३६.१६ | |
| ४,९६,१५१.०० | सभागृह ॲडव्हान्स | ८,४१,७८६.०० | |
| | (पान नं. १८ वर) | | |

## अखेर ताळेबंद

| २०१८-२०१९ रुपये पैसे | जिदंगी व येणे | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **शिल्लक कॅश** | | |
| १,८०,७६९.१० | हाती शिल्लक | ५३,७३६.१९ | |
| २६,३०२.७९ | करंट अकाऊंट बँक ऑफ इंडिया १०१० | ३,९९,१३५.७८ | |
| २०,४०,३३३.६७ | करंट अकाऊंट बॅसीन कॅथॉ. बँक ६८१ | १७,२३,१७१.६४ | |
| १,०९,६२४.०७ | करंट अकाऊंट ठाणे बँक ०३५/१२ | १,७६,१०३.०७ | |
| ६,५९९.२६ | सेव्हिंग अकाऊंट ठाणे बँक ०३१/१३ | ८,८३३.२६ | |
| ३४,६१०.०० | सेव्हिंग अकाऊंट बँक ऑफ इंडिया ६७२४ | ३५,८१५.०० | |
| २३,०५,७८२.८९ | वसई विकास सह. बँक लि. २२०६ | २५,४०,०९३.४५ | |
| १४,८८६.७४ | करंट अकाऊंट बँक ऑफ इंडिया नेट बँकींग | १४,३९९.९६ | ४९,५१,२८८.३५ |
| | **गुंतवणूक जनरल** | | |
| १,३४,४१०.०० | शेअर्स - सहकारी संस्था | १,३४,४१०.०० | |
| ६,६९,४२२.२६ | बँक ऑफ इंडिया, बंगली शाखा | ६,७३,२६६.०६ | |
| २,५०,७०,८४१.०० | वसई विकास सह. बँक लि. | २,६१,०५,६५४.०० | |
| २,०१,४५,३८४.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह. बँक वसई | २,१६,००,६४७.०० | |
| १,३६,२७,०६३.०० | बॅसीन कॅथॉ. बँक | १,८३,३७,७१०.०० | |
| ७६,८५२.०० | सहकार भूषण पुरस्कार ठेव - (ठाणे जिल्हा मध्य.बँक) | ७६,८५२.०० | |
| १७,८०,६६१.०० | स्पे. इम. रिझर्व्ह फंड - ठाणे जिल्हा बँक | १९,६५,३१०.०० | |
| | | | ६,८८,९३,८४९.०६ |
| १,०६,५९,९३९.०० | **गुंतवणूक कामगारवृंद ग्रॅच्यूएटी फंड** | | १,१५,५८,१४१.०० |
| १,७९,८८५.०० | **सभासद कर्ज** | | १,८०,९८५.०० |
| | **येणी** | | |
| १९,६२,७९४.९६ | डिपॉझिट | १७,७६,२९४.९६ | |
| २६,५२,५४२.०० | सिमेंट ॲडव्हान्स | ४२,११,०८२.४० | |
| ३४,८८७.७५ | मिश्रण खत खाते | २७,०००.०० | |
| १६,६६,४९३.२० | ऑईल ॲडव्हान्स खाते | १७,७९,९१९.९५ | |
| १,००,५००.०० | भारत गॅस स्टॅम्प ड्यूटी | ५६,०००.०० | |
| ३,५१,०८२.०० | कामगारवृंद कर्ज | ३,८१,७४६.०० | |
| ६०,३१,९५५.०० | व्याज येणे | ७०,४३,८३२.०० | |
| ९४,४८६.७१ | भारत गॅस एस. व्ही. टी. व्ही. डिपॉझिट | ९५,०७७.५८ | |
| | (पान नं. १९ वर) | | |

## दि. ३१ मार्च २०२०

| २०१८-२०१९ रुपये पैसे | भांडवल व देणे | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १६ वरुन) | | |
| १,६३,५६५.३५ | सरकारी खत (अनामत) | १,६३,५६५.३५ | |
| १,२६,९५४.२० | ऑईल ॲडव्हान्स | १,५३,७८९.२० | |
| ३८,३६२.०० | सिमेंट ॲडव्हान्स | ३२,९००.०० | |
| ३२,१२१.०० | एफ.टी.एल.खाते | ४,३१२.०० | |
| ७१,६८०.०२ | भारत गॅस ॲडव्हान्स | १६,९१४.०२ | |
| ४,३७५.०० | मिश्रण खत | ---- | |
| | | | ८२,२७,०१६.७८ |
| | **इतर देणी** | | |
| ६४,११,०४४.४० | तरतूद | २३,११,२६५.४० | |
| ---- | नोकरवृंद अधिलाभांश तरतूद | ८,४०,०३४.०० | |
| २,८६,९३०.०० | व्याज देणे | २,०१,६८९.०० | |
| ४,२८५.०० | टी. डी. एस. प्रोफेशनल फी | १५,५६०.०० | |
| २७,२००.०० | कामगारवृंद प्रोफेशनल टॅक्स | २९,१००.०० | |
| १,५६,३५०.०० | नोकरवृंद प्रॉव्हिडंड फंड | १,८०,७१५.०० | |
| ८३,१४२.०० | कामगारवृंद पेन्शन फंड | ९६,०९५.०० | |
| ८९,६४७.०० | नोकरवृंद इ.एस.आय.सी. फंड | ४८,९३६.०० | |
| ७२,७४१.०० | वेतन ॲडव्हान्स | २३,०२४.०० | |
| ७,४६७.०० | टी. डी. एस. कॉन्ट्रॅक्टर | ७,०४५.०० | |
| ---- | जी. एस. टी. | १,२०,८६४.३० | |
| ८,३९,८४५.२१ | कामगार देणे | ७९,२९४.२१ | |
| | | | ३९,५३,६२१.९१ |
| ५,८८,५२०.५३ | येणी नफातोटा खाती वर्ग | | ५,८६,१८४.६५ |
| **८३,४२,०९०.७३** | **निव्वळ नफा** | | **९०,४८,१३२.५५** |
| **१२,४४,७८,१८८.९२** | **एकूण** | | **१३,३४,३५,३५१.३६** |

ह्याच तारखेच्या आमच्या तपासणी अहवालातील शेऱ्यांस पात्र राहून
**मे.बल्दानिया अँड कंपनी**, चार्टर्ड अकौंटंटस्
**( प्रकाश बल्दानिया )**
मालक

## अखेर ताळेबंद

| २०१८-२०१९ रुपये पैसे | जिदंगी व येणे | रुपये पैसे | २०१९-२०२० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १७ वरुन) | | |
| ६,०६,४३५.७३ | वॅट टॅक्स | ६,०६,४३५.७३ | |
| ११,९२,९१६.७४ | भारत गॅस ॲडव्हान्स | १३,९५,६४२.९८ | |
| ५,०५,५७९.०० | एफ. टी. एल. खाते | ३,८७,१२९.५० | |
| ४,९२,०७८.०२ | बिर्ला व्हाईट सिमेंट खाते | ८,०३,३३४.०१ | |
| १२,२३,६८५.२५ | व्यापारी उधारी | २६,१४,९०७.१० | |
| ३१,३६७.०९ | अनामत | २९,४३८.५९ | |
| १९,५१,०९८.४३ | ॲडव्हान्स | १३,२५,३५१.१७ | |
| १,८०,१७१.५८ | जी. एस. टी. | ---- | |
| ---- | कामगार येणे | ४०,३७५.५० | २,२५,७३,५६७.४७ |
| **४२,७९,३९२.००** | **स्थावर मालमत्ता**<br>इमारती (देवतळे ४, दुकाने ५, गोदाम ४)<br>जमीन (देवतळे, वाघोली) | | **४१,२२,२२९.००** |
| **२५,९९,५१६.००** | **वाहने**<br>(४ ट्रक, ३ टेंपो, ६ जीप, २ दुचाकी व १ स्कार्पिओ) | | **२०,५८,००३.००** |
| **२,१८,६९९.००** | **मशिनरी**<br>(संगणक २७, प्रिंटर १५, यूपीएस १७, जनरेटर २) | | **८९,२९७.००** |
| **१६,२७,२०५.५०** | **डेडस्टॉक** | | **१४,९५,५६१.००** |
| **४,५८१.६५** | **लायब्ररी** | | **५१०१.८३** |
| ५,८८,५२०.५३ | अनामत येणी | | **५,८६,१८४.६५** |
| ४,८१,७३४.०० | विमा दावा येणे | | **४,८१,७३४.००** |
| **१,८५,३७,१०१.००** | **शिल्लक माल** | | **१,६४,३९,४१०.००** |
| **१२,४४,७८,१८८.९२** | **एकूण** | | **१३,३४,३५,३५१.३६** |

वरील ताळेबंद सोसायटीची सद्य परिस्थिती बरोबर दर्शवित आहे.

| **गौतम द. वर्तक** | **हरेश्वर ना. राऊत** | **समीर ज. पाटील** | **आशय ह. राऊत** |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक | मा. सचिव | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

## वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि॰ देवतळे-वसई.

## सन २०२०-२१ सालचे खर्चाचे अंदाज पत्रक

| क्र. | खर्चाचा तपशील | सन २०१९-२० चा अंदाज | सन २०१९-२० चा प्रत्यक्ष खर्च | वाढ ( + ) | घट ( - ) | सन २०२०-२१ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | किरकोळ खर्च | ९,००,०००.०० | १०,६१,७८७.०० | १,६१,७८७.०० | | ११,००,०००.०० |
| २ | सेवक वर्ग खर्च | ८५,००,०००.०० | ७७,६८,०६९.०० | | ७,३१,९३१.०० | ९०,००,०००.०० |
| ३ | सभा खर्च | ४,००,०००.०० | ३,२९,२३७.०० | | ७०,७६३.०० | ४,००,०००.०० |
| ४ | प्रवास खर्च | १,५०,०००.०० | १,२९,८५१.०० | | २०,१४९.०० | २,००,०००.०० |
| ५ | विमा खर्च | ५,५०,०००.०० | ६,५३,६०८.०० | १,०३,६०८.०० | | ७,००,०००.०० |
| ६ | टेलिफोन खर्च | २,००,०००.०० | १,०१,८४२.०० | | ९८,१५८.०० | २,००,०००.०० |
| ७ | वीज व जनरेटर खर्च | ७,५०,०००.०० | ६,६७,९११.०० | | ८२,०८९.०० | ७,००,०००.०० |
| ८ | सभासद व ग्राहक सूट | २,००,०००.०० | ५७,२०७.०० | | १,४२,७९३.०० | २,००,०००.०० |
| ९ | बँक चार्जेस | १,००,०००.०० | १८,८९८.०० | | ८१,१०२.०० | १,००,०००.०० |
| १० | तरतुदी | १०,००,०००.०० | ३६,००,०००.०० | २६,००,०००.०० | | ३०,००,०००.०० |
| ११ | व्याज देणे | ३,००,०००.०० | १,६५,८१८.०० | | १,३४,१८२.०० | २,००,०००.०० |
| १२ | प्रिंटींग व स्टेशनरी | ४,००,०००.०० | ३,७७,९४७.०० | | २२,०५३.०० | ४,००,०००.०० |
| १३ | घरपट्टी व जमीनधारा | १,००,०००.०० | १,२६,७३०.०० | २६,७३०.०० | | २,००,०००.०० |
| १४ | आयकर | ८,००,०००.०० | ३०,७०,०६६.०० | २२,७०,०६६.०० | | २०,००,०००.०० |
| १५ | लेखापरीक्षण शुल्क | ४,५०,०००.०० | ४,१३,७५२.०० | | ३६,२४८.०० | ५,००,०००.०० |
| १६ | इमारत दुरुस्ती | ५,००,०००.०० | ३,१३,८५७.०० | | १,८६,१४३.०० | १५,००,०००.०० |
| १७ | घसारा | १५,००,०००.०० | १०,३९,५२५.०० | | ४,६०,४७५.०० | १५,००,०००.०० |
| १८ | संगणक खर्च | २,००,०००.०० | ८०,०९५.०० | | १,१९,९०५.०० | ३,००,०००.०० |
| १९ | सभागृह व इतर खर्च | ५,००,०००.०० | ५,८७,४६२.०० | ८७,४६२.०० | | ५,००,०००.०० |
| २० | नफा | ९०,००,०००.०० | ९०,४८,१३३.०० | ४८,१३३.०० | | ९८,००,०००.०० |
| | **एकूण** | **२,६५,००,०००.००** | **२,९६,११,७९५.००** | **५२,९७,७८६.००** | **२१,८५,९९१.००** | **३,२५,००,०००.००** |

## वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिः देवतळे-वसई.

## सन २०२०-२१ सालचे उत्पन्नाचे अंदाज पत्रक

| क्र. | उत्पन्नाचा तपशील | सन २०१९-२० चा अंदाज | सन २०१९-२० चा प्रत्यक्ष उत्पन्न | वाढ ( + ) | घट ( - ) | सन २०२०-२१ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यापारी नफा | १,८७,००,०००.०० | २०,९९,७४८८.०० | २२,९७,४८८.०० | | २,४२,००,०००.०० |
| २ | व्याज जमा | ५५,००,०००.०० | ६,०३,८५९७.०० | ५,३८,५९७.०० | | ६५,००,०००.०० |
| ३ | इतर उत्पन्न | ८,००,०००.०० | ७६,८७१०.०० | | ३१,२९०.०० | ८,००,०००.०० |
| ४ | सभागृह भाडे | १५,००,०००.०० | १,८०,७०००.०० | ३,०७,०००, | | १०,००,०००.०० |
| | एकूण | २,६५,००,०००.०० | २,९६,११,७९५.०० | ३१,४३,०८५.०० | ३१,२९०.०० | ३,२५,००,०००.०० |

# अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल

आम्ही, वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., देवतळे - वसई, जि. पालघर, या संस्थेचे दिनांक ३१ मार्च २०२० रोजीचे ताळेबंद पत्रक व त्या दिवशी पूर्ण होणाऱ्या सहकार वर्षाचे व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक अंतर्गत लेखा परिक्षक म्हणून पाहिले असून, त्याबाबत अहवाल देतो की,

१) आमच्या हिशोब तपासणीच्या उद्देशासाठी आमच्या पूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेच्या १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले ताळेबंद पत्रक, व्यापारी पत्रक व नफा तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आणि आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यांत आलेल्या खुलाशावरुन व आम्ही जोडलेल्या शेरे पत्रकातील शेरे लक्षात घेता हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेच्या १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती सर्व माहिती देतात आणि

अ) ताळेबंद पत्रक संस्थेची ३१ मार्च २०२० अखेर खरी व योग्य परिस्थिती दाखविते व

ब) नफा - तोटा पत्रक संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२० अखेर होणाऱ्या सहकार वर्षाचा खरा व योग्य नफा दाखवितो.

देवतळे - वसई.

दिनांक : १८-१२-२०२०

**मे. बल्दानिया अँड कंपनी**, चार्टर्ड अकौंटंटस् करिता

**( प्रकाश बल्दानिया )**

(मालक)

अंतर्गत लेखा परिक्षक.

# वैधानिक लेखा परिक्षक अहवाल

नमुना 'एन-२'
(कलम ८१ आणि नियम ६९(३) पाहा)

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.
देवतळे, ता. वसई, जि. पालघर

**विषय :** नेमणूकपत्र संदर्भ क्र. वशेविकासमो/१५४/मास दि. ११-९-२०१९
प्रमाणिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल.

१) वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., वसई यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२० पर्यंतचे असून वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरणपत्र तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामध्ये मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३) केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षण जे उघड न केलेले आणि रक्कम आतील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे व ते लेखापरिक्षकांच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

**अभिप्राय**

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य ते उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारण भारतात मान्य केला आहे

१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२०

२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी आणि इतर कायदेशीर आणि नियामक बाबीवरील अहवाल

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

८) अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हांस असे आढळून आले आही की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०) आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो :

१) या अहवालासंदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरण पत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यावर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखांचे ताळेबंद पत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केले असून, तो आम्हांला जरुरूचा आहे त्याप्रमाणे दिलेला आहे.

४) लेखापरिक्षण चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला '**अ**' वर्ग मिळाला आहे.

देवतळे - वसई.
दिनांक : २३-१२-२०२०

**मे. मनिष शिंदे अँड असोसिएट**, चार्टर्ड अकौंटन्टस्
शासकीय प्रमाणित लेखापरिक्षक सहकारी संस्था